स्त्री म्हणजे वात्सल्य,
स्त्री म्हणजे मांगल्य,
स्त्री म्हणजे मातृत्व,
स्त्री म्हणजे कर्तृत्व..
**जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!**

# दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

HAPPY Women's Day MARCH 8

• वर्ष : ०३ • अंक : १६९ • पुणे • रविवार, दि. ०८ मार्च २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313





जळगाव आरटीओच्या टेस्ट ट्रॅकवरील सुविधांचा अभाव 3





प्राजक्ता गायकवाड ट्रोल; ओमचा ट्रोलर्सना सवाल 4


# तुम्ही स्वार्थी की अजितदादा प्रेमी?

## दाखवून द्या : रोहित पवारांचे प्रफुल पटेलांना आव्हान

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूबाबत वारंवार प्रश्न उपस्थित करत व्हीआरएस विमान कंपनीवर कारवाईची मागणी करणाऱ्या आमदार रोहित पवार यांनी माजी केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री प्रफुल पटेल यांना आव्हान दिले. दुसरीकडं माजी मंत्री विजय शिवतरे यांनीदेखील अजित पवारांच्या अपघाती मृत्यूबाबत संशय व्यक्त केला. आमदार रोहित पवार यांनी एक्स मीडियात पोस्ट करत म्हटलं, " प्रफुल पटेल जी (माजी केंद्रीयनागरी उड्डाणमंत्री) आपणास विनंती आहे की, अजितदादांच्या अपघाताला अथवा घातपातला कारणीभूत असलेल्या व्हीएसआर कंपनीच्या मालकाचा मुलगा रोहित सिंग याच्या राजस्थानमध्ये पार पडलेल्या लग्नात आपण गेला होतात का? गेला असालच तर त्या लग्नात इतर कोण नेते होते आणि कुठल्या पक्षाचे होते? हे तुम्हाला माहीतच असेल ते आपण लोकांना सांगावं.



तुम्ही स्वार्थी आहात की अजितदादा प्रेमी आहात, हे महाराष्ट्राला दाखवून द्या. उद्या पत्रकार परिषद घेऊन याबाबत स्पष्टीकरण द्याल, ही अपेक्षा.! रोहित पवार यांनी बिहारमधील राष्ट्रीय जनता दलाचे अभ्यासू नेते आणि राज्यसभा खासदार मनोज कुमार झा साहेब यांची दिल्लीत भेट घेऊन त्यांनाही अजितदादांच्या विमान अपघातासंदर्भात सविस्तर माहिती दिली. या अपघाताशी संबंधित सर्व पुराव्यांचं प्रेझेंटेशन दिलं. या विमान अपघाताबाबतचे पुरावे पाहून त्यांनाही आश्चर्य वाटल्याचं रोहित पवार यांनी एक्स मीडियातील पोस्टमध्ये म्हटलं. अजितदादांना न्याय मिळवून देण्यासाठी हा विषय राज्यसभेत मांडण्याचं खासदार झा यांनी आमदार रोहित यांना आश्वासन दिलं.

### चौकशी व्हावी : शिवतारे

**अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत आमदार विजय शिवतरे यांनीदेखील संशय व्यक्त केला. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत निर्माण झालेल्या संशयाच्या पार्श्वभूमीवर सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी माजी मंत्री विजय शिवतरे यांनी केली आहे. या घटनेतील काही तांत्रिक बाबी आणि परिस्थिती लक्षात घेता सत्य बाहेर येणं गरजेचे असल्याचं त्यांनी शनिवारी पुरंदर तालुक्यात माध्यमांशी बोलताना म्हटलं. ते पुरंदर तालुक्यातील वाघापूर येथे आयोजित 'महाराज स्वराज्य शिबीर' कार्यक्रमानिमित्त आले होते.**

## ठळक बातम्या

### पोमलवाडी पुलाला ३४० कोटींची तरतूद

**बारामती (आरंभ पर्व) : राज्याच्या अर्थसंकल्पात इंदापूर (जि. पुणे) आणि करमाळा (जि. सोलापूर) तालुक्यांना थेट जोडणाऱ्या उजनी धरणाच्या जलाशयावर उभारण्यात येणाऱ्या चांडगाव-पोमलवाडी भव्य पुल प्रकल्पासाठी ३४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या पुलामुळे दोन्ही तालुक्यांमधील दळणवळण सुलभ होणार असून, सुमारे ४० किमी अंतर कमी होऊन वेळ आणि इंधनाची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.**

### मंचरमध्ये हाय व्होल्टेज ड्रामा..!

**पुणे (आरंभ पर्व) : पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील मंचर येथे दर्गा आणि पांडवकालीन बारव संदर्भातील वाद पुन्हा एकदा चिघळलाय. या पार्श्वभूमीवर राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी शुक्रवारी मंचर येथे भेट देत परिस्थितीची पाहणी केली. मात्र या भेटीदरम्यान पोलिसांशी झालेल्या वादामुळे काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झालं होतं. यादरम्यानचा व्हिडिओ चर्चेत आला आहे. पुणे जिल्ह्यातील मंचर येथे दर्गा आणि पांडवकालीन बारव संदर्भातील वाद गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे.**

### लग्नाच्या नावाखाली 3 वेळा विकलं

**पुणे (आरंभ पर्व) : पैशांच्या हव्यासामुळे माणुसकी किती खालच्या पातळीला जाऊ शकते, याचा प्रत्यय बीडच्या आष्टी तालुक्यात आला आहे. एका 21 वर्षीय विवाहित तरुणीला लग्नाच्या बहाण्याने अवघ्या एका महिन्यात तब्बल तीन वेळा वेगवेगळ्या व्यक्तींना विकण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. वारंवार होणारा हा 'व्यवहार' आणि अमानुष छळाला कंटाळून या तरुणीने विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. लातूर जिल्ह्यातील ही तरुणी पतीसोबतच्या वादामुळे माहेरी राहत होती. याच काळात तिची ओळख पुण्यातील हडपसर येथील महानंदा नावाच्या महिलेशी झाली.**

# १०वी-१२वी कॉपीप्रकरणी आतापर्यंत ८१ कर्मचारी निलंबित

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावी आणि दहावीच्या परीक्षेत यंदा सीसीटीव्ही यंत्रणेमुळे पुराव्यासह 'मास कॉपी'चे प्रकार उघड झाले. या प्रकरणी आतापर्यंत एकूण ८१ कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले आहे, अशी माहिती राज्य मंडळाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले. अधिक माहितीनुसार, बारावी बोर्ड परीक्षेत बीड जिल्ह्यात चौसाळा येथील कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात (केंद्र क्रमांक २२४) कॉपी प्रकार झाल्याचे उघड झाले आणि प्रशासनाने येथील १७ कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करून निलंबित केले आहे. पहिल्याच पेपरला अर्थात १० फेब्रुवारीला हा प्रकार घडला होता. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय जैतापूर येथे केंद्र क्रमांक-००७९ येथे मास कॉपीचा प्रकार घडला. यात पर्यवेक्षक केंद्र संचालक, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहकार्य करत असल्याचे सीसीटीव्हीवरून निदर्शनास आल्याने संबंधित २४ जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, २१ जणांना निलंबित केले आहे. याचबरोबर जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्यात केंद्र क्रमांक- ०४३९, ०४२३ आणि ०४२१ येथे इंग्रजी विषयाच्या पेपरला विद्यार्थी कॉपी करताना आढळून आले आहेत. त्यांच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही केलेली आहे. तसेच पर्यवेक्षक म्हणून नियुक्त ०५ शिक्षकांवर निलंबनाची कार्यवाही केलेली आहे. केंद्र क्रमांक ९०६ श्री मैनागिरी महाराज कनिष्ठ महाविद्यालय, जमुडाफाटा येथे १६ फेब्रुवारी रोजी भौतिकशास्त्र विषयाच्या लेखी परीक्षेत ५८१ विद्यार्थ्यांनी सामूहिक कॉपी केल्याचे निदर्शनास आले, प्रयोगशाळा परिचर यांच्याकडे मोबाइल आढळला आहे. तीन संस्थेच्या सहा शाळांमधील २८ कर्मचारी निलंबित केले आहे. गडचिरोली येथील ब्रोमनवार विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय केंद्र क्रमांक ६१५ येथे राज्यशास्त्र विषयाच्या मायक्रोनोट व चॅट जीपीटी प्रिंटआउट काढलेल्या आणि सामूहिक कॉपी प्रकार आढळला. या प्रकरणी तीन शिक्षक व एक शिपाई यांच्यावर गुन्हा दाखल करत या सर्वांना निलंबित केले आहे. धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर तालुक्यातील परीक्षा केंद्र क्र. ३९३ जि. प. हायस्कूल, सलगरा येथे १८ फेब्रुवारी रोजी रसायनशास्त्र या विषयाला नऊ विद्यार्थी गैरमार्ग करीत असताना आढळून आले.



**दहावी परीक्षेत बीड जिल्ह्यातील कुर्ला तालुक्यात यशवंत विद्यालय येथे परीक्षा केंद्र क्र. २०५६ येथे परीक्षार्थ्यांची गैरसोय झाल्यामुळे मुख्याध्यापक तथा केंद्र संचालक यांना निलंबित केलेले आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात बेटमोगरा येथे परीक्षा केंद्र क. ५२३१ जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये तोतया विद्यार्थी परीक्षा देत असल्याचे आढळून आले. याची गंभीर दखल घेत परीक्षक व परीक्षा केंद्राचे केंद्रप्रमुख यांना निलंबित केले आहे.**

# अर्थसंकल्पात मेट्रो, महामार्ग आणि रेल्वेसाठी हजारो कोटींच्या प्रकल्पांना मंजुरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्याच्या अर्थसंकल्पात पुणे शहर आणि परिसरासाठी मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा प्रकल्पांची घोषणा करण्यात आली आहे. रस्ते, मेट्रो, रेल्वे आणि धार्मिक स्थळांच्या विकासासाठी हजारो कोटी रुपयांच्या योजनांना मान्यता देण्यात आली आहे. यामुळे पुणे आणि औद्योगिक पट्ट्यांमधील वाहतूक सुलभ होणार असून शहराच्या विकासाला गती मिळणार आहे. अर्थसंकल्पात तळेगाव ते चाकण या औद्योगिक पट्ट्याला जोडणाऱ्या उन्नत मार्गासाठी ६४९९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हा २५ किलोमीटर लांबीचा प्रकल्प असून त्यामुळे चाकण MIDC परिसरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होण्याची अपेक्षा आहे.



चाकण–शिक्रापूर मार्गाच्या २८ किमी लांबीच्या महामार्गाचे महापदरीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कामासाठी ५३३२ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. यामुळे पुणे–नगर आणि पुणे–नाशिक मार्गावरील वाहतूक अधिक वेगवान होणार आहे. पुणे ते छत्रपती संभाजीनगर प्रवास जलद करण्यासाठी शिरूर ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान १९२ किमी लांबीचा ग्रीनफिल्ड महामार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत १४,८८६ कोटी रुपये असून सध्या त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला जात आहे. हडपसर ते यवत या ३१.५ किमी लांबीच्या महामार्गासाठी ५२८२ कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. पुणे–सोलापूर मार्गावरील वाहतूक सुधारण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. संत तुकाराम महाराजांच्या पवित्र स्थळ देहू येथे विकास आराखडा तयार करण्याची घोषणा करण्यात आली आहे. धार्मिक पर्यटन वाढवणे आणि परिसरातील पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी हा आराखडा महत्त्वाचा ठरणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले. पुणे–लोणावळा दरम्यान तिसरा आणि चौथा रेल्वे मार्ग उभारण्याच्या ५१०० कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे पिंपरी-चिंचवड, आकुर्डी आणि तळेगाव औद्योगिक पट्ट्यांना मोठा फायदा होणार आहे.

# व्यावसायिक एलपीजी गॅसचा पुरवठा बंद

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

आखाती युद्धाची झळ आता पिंपरी-चिंचवड शहरालाही बसू लागली आहे. घरगुती एलपीजी गॅसचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडरचा पुरवठा शुक्रवार (दि. ६) पासून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे शहरातील हॉटेल, कंपन्या व व्यावसायिक आस्थापनांना होणारा गॅसपुरवठा ठप्प झाल्याने उद्योग आणि व्यवसायांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. दरम्यान, सीएनजी गॅसचा पुरवठा सुरळीत असल्याची माहिती पंपचालकांकडून देण्यात आली. पिंपरी-चिंचवड शहरात चाकण येथील



हिंदुस्थान पेट्रोलियम, शिक्रापूर येथील भारत पेट्रोलियम तसेच इंडियन ऑइल कॉर्पोरेशनकडून गॅसचा पुरवठा केला जातो. आखाती युद्धामुळे पुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन घरगुती ग्राहकांना गॅसचा तुटवडा भासू नये म्हणून पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी गॅस वितरकांना पुरवठा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या उपलब्ध असलेला सिलिंडरचा साठा घरगुती एलपीजी ग्राहकांसाठी राखून ठेवण्यात आला आहे.

शुक्रवारी वितरकांकडे शिल्लक असलेल्या व्यावसायिक सिलिंडरचे वाटप करण्यात आले. मात्र, पुढील पुरवठा कधी सुरू होणार याबाबत अद्याप कोणतीही माहिती देण्यात आलेली नसल्याचे शहरातील गॅस वितरकांनी सांगितले.

# नेम एकावर गेम दुसऱ्याचा


**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गुलटेकडी येथील मीनाताई ठाकरे वसाहत येथील रेकॉर्डवरील गुन्हेगाराचा पूर्ववैमनस्यातून गेम करायचा होता, परंतु गोळी दुसऱ्यालाच लागल्याचा प्रकार समोर आला आहे. मार्केट यार्डतील वखार महामंडळाकडून गंगाधामकडे जाणाऱ्या रोडवर रात्री साडेअकराच्या सुमारास ही घटना घडली. मोझेस शेकापूरे ऊर्फ मोज्या (वय २२, रा. मीनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. त्याच्या पाठीत गोळी शिरली असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. मीनाताई ठाकरे वसाहतीत बालाजी उमाप, राम उमाप व त्याच्या साथीदार व शेकापुरे टोळीमध्ये वर्चस्व वादातून अनेकदा वाद झाले आहेत. काही दिवसांपूर्वी अल्पवयीन मुलांनी हवेत गोळीबार केला होता. यावरून बालाजी उमाप आणि अमित शेकापुरे यांच्यात शुक्रवारी




दुपारी वादावादी झाली. त्यानंतर अमित शेकापूरे याचा भाऊ मोझेस शेकापुरे व त्याचा मित्र हे दुचाकीवरून शुक्रवारी रात्री साडेअकरा वाजता वखार महामंडळाकडून गंगाधामकडे जात होते. यावेळी बालाजी उमाप, राम उमाप व त्याचे ४ ते ५ साथीदार दुचाकीवरून आले. त्यांनी शेकापुरे व त्याच्या मित्राला अडविले. यावेळी उमाप याने गोळीबार केला. ती गोळी शेकापुरे याच्या पाठीत शिरली. तो जागेवरच कोसळला. हे पाहिल्यावर हल्लेखोर पळून गेले. मार्केट यार्ड पोलिसांना शेकापूरे याला रुग्णालयात दाखल केले असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. हल्लेखोरांना शेकापुरे नाही तर त्याच्याबरोबर असलेल्या मित्राला मारायचे होते, मात्र, गोळीबारात शेकापुरे हा जखमी झाल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. मार्केट यार्ड पोलिस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विश्वजित जगताप पुढील तपास करत आहेत.

फायरिंगची घटना घडताच पोलिस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी पोलिस पथके तयार करून आरोपींच्या मुसक्या आवळण्याचे आदेश दिले. १२ तासांच्या आत मार्केटयार्ड पोलिसांनी याप्रकरणातील आरोपी बालाजी उमाप (वय २२, रा. मीनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी), साहील चव्हाण (वय २०), राजू उमाप (वय ५५, रा. आरण्येश्वर, सहकारनगर), शुभम दिलीप पवार (वय २०) आणि आनंद उमाप (वय २२, रा. वडगाव, सिंहगड रोड) या आरोपींना सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय बातमीदारमार्फत माहितीच्या आधारे सापळा रचून ताब्यात घेत अटक केली. ही कामगिरी पोलिस आयुक्त अमितेश कुमार, पोलिस सहआयुक्त रंजन कुमार शर्मा, अपर पोलिस आयुक्त मनोज पाटील, पोलिस उपायुक्त मिलिंद मोहिते, सहायक पोलिस आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली मार्केटयार्ड पोलिसांच्या पथकाने केली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### मालखेड ग्रामपंचायतीकडून १५ शिलाई मशीनचे वाटप

मालखेड (आरंभ पर्व) : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत मालखेड यांच्या वतीने महिलांच्या स्वावलंबनासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात आला. यावेळी मालखेड गावातील महिलांना एकूण १५ शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला ग्रामपंचायत मालखेडचे सरपंच नंदाताई जोरी, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य पोलीस पाटील,तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांनी स्वावलंबी व्हावे, स्वतःचा लघुउद्योग सुरू करून आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे यावेळी सरपंचप नंदा जोरी यांनी सांगितले. महिला दिनाच्या निमित्ताने झालेल्या या उपक्रमाचे गावातील महिलांनी स्वागत केले असून, यामुळे अनेक महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत मालखेड यांच्या वतीने करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांनी महिलांना स्वावलंबन आणि आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे आवाहन केले.

### टेम्पो दरीत कोसळला; सुदैवाने तीन-चार जणांचा जीवितहानीतून बचाव

सिंहगड (आरंभ पर्व) : सिंहगड घाटात उताराने खाली येत असताना तळई उद्यानाच्या खाली आणि ११ हजार पॉईंटच्या वरच्या कॉर्नरवर एका डिव्हायडरला टेम्पो धडकून तो दरीत कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने वाहनातील तीन ते चार जण या अपघातातून सुखरूप बचावले. मिळालेल्या माहितीनुसार, टेम्पो घाटातून खाली येत असताना पर्यटकांना घेऊन वर येणाऱ्या एका वाहनाला वाचवण्याच्या प्रयत्नात चालकाचा टेम्पोवरील ताबा सुटला. त्यामुळे टेम्पो रस्त्यावरील डिव्हायडरला धडकून खाली दरीत गेला. घटनेची माहिती मिळताच हवेली आपत्ती व्यवस्थापन पथकाने वन विभागाच्या स्थानिक अधिकारी व कर्मचाऱ्यांसह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच हवेली पोलीस ठाण्याचे अधिकारी व पोलीस कर्मचारी पोलीस पाटील यांच्या समवेत घटनास्थळी दाखल झाले. अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर जखमींना घरी सोडण्यात आल्याची माहिती मिळाली.




### मिस अँड मिसेस महाराष्ट्र २०२६ स्पर्धेच्या पुणे ऑडिशन्सची घोषणा

पुणे (आरंभ पर्व) : स्मृती एंटरप्राईझेसच्या वतीने 'द ज्वेल वन पेजेंट – मिस अँड मिसेस महाराष्ट्र 2026' या भव्य राज्यस्तरीय सौंदर्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेच्या पुणे ऑडिशन्स 13 मार्च 2026 रोजी आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आज आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. या स्पर्धेच्या माध्यमातून महाराष्ट्रभरातील महिलांना आपली प्रतिभा, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व प्रभावीपणे सादर करण्याची संधी मिळणार आहे. या पत्रकार परिषदेला स्मृती एंटरप्राईझेसच्या संचालिका स्मृती बोनगे, संचालक आधार शिंदे तसेच इवेंट पार्टनर सारिका तुळवे पाटील,अनिल व्यवहारे,ईशा यादव उपस्थित होते. स्पर्धेच्या पुणे ऑडिशन्स 13 मार्च 2026 रोजी सदाशिव पेठ येथील सॅफ्रॉन बॅन्क्वेट्स येथे होणार असून यावेळी सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या स्पर्धेत 18 ते 55 वयोगटातील महिलांना सहभागी होता येणार असून नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. सहभागी महिलांसाठी विविध मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास आणि करिअरच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या स्पर्धेत विवाहित आणि अविवाहित महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले असून अंतिम फेरीत विजेत्यांना एकूण 12 लाख रुपयांपर्यंतची बक्षिसे तसेच मनोरंजन, फॅशन आणि मॉडेलिंग क्षेत्रात पुढे जाण्याच्या विविध संधी मिळणार आहेत. महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये ऑडिशन्स आयोजित करण्यात येणार असून त्यातून निवड झालेल्या स्पर्धकांमध्ये ग्रँड फिनाले पार पडणार आहे.फिनाले मध्ये ज्या स्पर्धकांची निवड होईल अशा 40 स्पर्धकांना स्मृती एंटरप्राईझेस आणि पेंटेन स्टुडियोज प्रस्तुत 'जयोस्तुते' या म्यूजिक अल्बम मधे काम करण्याची संधी मिळणार आहे.



### धर्मांतरविरोधी कायद्याचे नागरिक सोशल फाउंडेशनकडून स्वागत

पुणे (आरंभ पर्व) : राज्यात वाढत्या बेकायदेशीर धर्मांतराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने तातडीने "महाराष्ट्र फ्रीडम ऑफ रिलीजन (Prevention of Fraud & Coercion) Act"पारित करून लागू करावा, अशी मागणी नागरिक सोशल फाउंडेशन (NSF) या सामाजिक संस्थेने केली होती. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नुकतीच कॅबिनेट बैठकीत हा कायदा आणण्याची तयारी केली आहे, राज्य सरकारच्या या भूमिकेचे नागरिक सोशल फाउंडेशनकडून स्वागत करण्यात आले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा कायदा आणणयाचे सुतोवाच केल्याने त्यांचे आणि राज्य सरकारचे आभार माणण्यासाठी पुणे श्रमिक पत्रकार संघात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळो सीए सर्वेश मेहेंदळे, संचालक प्रीतम थोरवे, पुष्कर सप्रे उपस्थित होते. नागरिक सोशल फाऊंडेशनने मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात नमूद केले होते की, महाराष्ट्रातील आदिवासी बहुल भाग विशेषतः धुळे, नंदुरबार, पुणे आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये बळजबरी, फसवणूक किंवा प्रलोभनाद्वारे धर्मांतराच्या तक्रारी सातत्याने येत आहेत. अशा प्रकारचे अवैध धर्मांतर हे व्यक्तीच्या धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणणारे असून सामाजिक सौहार्दालाही गंभीर धोका निर्माण करणारे आहे.

# अजितदादा पवार विमान अपघात प्रकरणाची चौकशी करा

- संबंधित कंपनीवर गुन्हा दाखल करा – नागेश चव्हाण
- १० मार्चपासून आझाद मैदान येथे आमरण उपोषणाची घोषणा



**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कथित विमान अपघात प्रकरणाला जवळपास एक महिना उलटूनही अद्याप स्पष्ट चौकशी अहवाल समोर आलेला नसल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणातील जबाबदार विमान कंपनी व संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर जिल्हा सरचिटणीस नागेश चव्हाण यांनी १० मार्चपासून मुंबईतील आझाद मैदान येथे आमरण उपोषण करण्याची घोषणा केली आहे. या आंदोलनात सोलापूर जिल्ह्यासह पुणे व राज्यातील विविध भागांतून राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते, महिला भगिनी आणि समर्थक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. अजितदादा पवार यांच्या विमान अपघात प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी आणि जबाबदारांवर कठोर कारवाई व्हावी, ही या आंदोलनाची मुख्य मागणी असल्याचे नागेश चव्हाण यांनी स्पष्ट केले. या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबई पोलीस महासंचालक, मुंबई पोलीस आयुक्त तसेच मुंबई शहराचे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

दरम्यान, या प्रकरणाबाबत विविध स्तरांतून शंका व्यक्त होत असून काही नेत्यांनीही आवाज उठवला आहे. आमदार रोहित पवार आणि आमदार अमोल मिटकरी यांनीही या घटनेची पारदर्शक चौकशी व्हावी, व गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली आहे. नागेश चव्हाण यांच्या आमरण उपोषणामुळे या प्रकरणाला आता अधिक तीव्र राजकीय व सामाजिक पाठिंबा मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. "जनतेसाठी कटिबद्ध असणाऱ्या नेत्याबाबत घडलेल्या या घटनेमागील सत्य समोर यावे, हीच आमची भूमिका आहे," असेही नागेश चव्हाण यांनी सांगितले.

## ८ मार्च रोजी पुण्यात कर्तृत्ववान महिलांचा गौरव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यस्तरीय "शिक्षण संजीवनी" या मासिकाच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त शिक्षण क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा, राज्यस्तरीय कविता लेखन स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव आणि प्रतिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन असा बहुविध कार्यक्रम रविवारी ८ मार्च २०२६ रोजी पुण्यात आयोजित करण्यात आला आहे. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून साहित्य, शिक्षण आणि संस्कृती यांचा संगम या सोहळ्यात पाहायला मिळणार आहे. हा कार्यक्रम पुणे येथील मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स, टिळक रस्ता, शुक्रवार पेठ येथे सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. "शिक्षण संजीवनी" या राज्यस्तरीय मासिकाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक विचारांची प्रेरणा देण्याचे कार्य सातत्याने केले जाते. महिला दिनाच्या निमित्ताने कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचा सन्मान करून समाजासमोर आदर्श उभा करण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. कमलादेवी आवटे (सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे) या उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण, साहित्य व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## पुणे नदी सुधार प्रकल्प; विकास की पर्यावरणाचा प्रश्न?

**पुणे-लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील मुळा-मुठा नदी स्वच्छ, सुशोभित आणि नागरिकांसाठी आकर्षक बनवण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या पुणे नदीकिनारा विकास (नदी सुधार) प्रकल्पाबाबत सध्या पुण्यात मोठी चर्चा सुरू आहे. शहराच्या विकासासाठी महत्त्वाचा मानला जाणारा हा प्रकल्प एकीकडे वेग घेत असताना दुसरीकडे पर्यावरणाच्या दृष्टीने काही प्रश्नही उपस्थित केले जात आहेत.



या प्रकल्पांतर्गत मुळा आणि मुठा नदीच्या सुमारे ४४ किलोमीटर नदीकिनाऱ्याचा विकास करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नदी स्वच्छ ठेवणे, पूर नियंत्रण करणे तसेच नदीकाठ सुशोभित करून नागरिकांसाठी सार्वजनिक जागा निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ४७०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्याची अंमलबजावणी पुणे महानगरपालिका मार्फत करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत नदीकाठावर पायी चालण्यासाठी मार्ग, सायकल मार्ग, उद्याने, हरित पट्टे, खुली मैदाने, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी खुली रंगमंच व्यवस्था तसेच विविध सार्वजनिक सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे पुणेकरांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुंदर नदीकिनारा उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. काही भागांमध्ये नदीकाठ सुशोभीकरणाची कामे सुरू असून टप्प्याटप्प्याने संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

दरम्यान, काही पर्यावरणप्रेमी आणि सामाजिक संघटनांनी या प्रकल्पाबाबत चिंता व्यक्त केली आहे. नदीचा नैसर्गिक प्रवाह बदलण्याची शक्यता, नदीकिनारी जैवविविधतेवर होणारा परिणाम तसेच पूर व्यवस्थापनाबाबत काही प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यामध्ये संतुलन राखण्याची गरज असल्याचे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे. तथापि, प्रशासनाच्या मते हा प्रकल्प पर्यावरणीय नियमांचे पालन करूनच राबविण्यात येत असून नदी संवर्धनासोबत शहराच्या विकासालाही चालना देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. पुण्याच्या भविष्यातील विकासात मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार का, की पर्यावरणीय चिंता अधिक गंभीर ठरणार, याकडे आता पुणेकरांचे लक्ष लागले आहे.

## राजाभाऊ लायगुडे यांच्या वाढदिवसानिमित्त १९ वर्षांची परंपरा

### भव्य तीर्थयात्रेचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभाग क्रमांक ३४ चे कर्तव्यदक्ष नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांच्या वाढदिवसानिमित्त मुक्ताई प्रतिष्ठान धायरी यांचेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य तीर्थयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे ही तीर्थयात्रा गेली तब्बल १९ वर्षे अखंडपणे सुरू असून हजारो नागरिकांनी या पवित्र यात्रेचा लाभ घेतला आहे.

या तीर्थयात्रेमध्ये तुळजापूर, पंढरपूर, शिखर शिंगणापूर आणि अक्कलकोट या पवित्र तीर्थक्षेत्रांचे दर्शन घडविण्यात येणार आहे. भाविकांना एकाच यात्रेत अनेक प्रसिद्ध देवस्थानांचे दर्शन घेण्याची संधी मिळत असल्याने नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

> "नागरिकांना तीर्थक्षेत्रांचे दर्शन घडावे आणि समाजात अध्यात्मिक वातावरण निर्माण व्हावे, या हेतूने ही तीर्थयात्रा गेली अनेक वर्षे आयोजित केली जाते. यंदाही प्रभागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे."
> - राजाभाऊ लायगुडे.
> नगरसेवक पुणे मनपा

ही तीर्थयात्रा १३ मार्च व १४ मार्च रोजी पार पडणार असून यात्रेसाठी नोंदणी राजाभाऊ लायगुडे संपर्क कार्यालयात सुरू करण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक ३४ मधील जास्तीत जास्त नागरिकांनी या तीर्थयात्रेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडलाध्यक्ष यशवंतबापू लायगुडे यांनी केले आहे.



यात्रेत सहभागी होणाऱ्या भाविकांच्या जेवणाची व राहण्याची संपूर्ण व्यवस्था राजाभाऊ लायगुडे मित्र परिवाराच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. नाव नोंदणी करण्यासाठी संपर्क समीर रायकर ७२६३०९०९३६ आशिष कदम ९८५०९२९०८२

## "खाकीचा सन्मान आहे... पण खाकीतील अहंकाराचा नाही!"

- तक्रारींच्या ढिगाऱ्यात हरवतोय का न्याय?

**सिंहगड (दै. आरंभ पर्व)**

वर्दीचा सन्मान आम्ही करतो, पण वर्दीच्या आतल्या अहंकाराचा नाही. सामान्य माणसाला मिळणारी वागणूक हीच खाकीची खरी परीक्षा असते. मात्र तक्रार करूनही न्याय मिळत नसल्याची भावना समाजात वाढत चालल्याचा सवाल पत्रकार विशाल भालेराव यांनी उपस्थित केला आहे. कायद्याचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्या खाकी वर्दीकडून समाजाला मोठ्या अपेक्षा असतात. अन्याय झाला की नागरिक पोलीस ठाण्याचे दार ठोठावतो, कारण त्याला वाटते की येथे त्याला न्याय मिळेल. परंतु अनेक वेळा वास्तव याच्या उलट दिसून येते. तक्रार दिल्यानंतरही तात्काळ कारवाई होत नाही, चौकशीचा वेग मंदावतो आणि पीडित व्यक्ती न्यायाच्या प्रतीक्षेत थकून जाते. सामान्य नागरिकांचा आरोप आहे की, पोलीस ठाण्यात तक्रार घेऊन जाणे म्हणजे न्यायाचा मार्ग नसून कधी कधी अपमानाचा अनुभव ठरतो. तक्रार ऐकून घेण्याऐवजी शंका, उलट प्रश्न आणि कधी कधी उद्धट वागणूक मिळाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे न्याय मिळवण्यासाठी केलेली धडपडच काही वेळा अधिक वेदनादायक ठरते. खरे तर खाकी वर्दी ही केवळ अधिकाराचे प्रतीक नसते, तर ती लोकसेवेची शपथ असते. सामान्य माणसाशी कसे वागले जाते, त्याच्या तक्रारीला किती गांभीर्याने घेतले जाते यावरच त्या वर्दीची खरी प्रतिष्ठा उभी असते. पण जेव्हा अधिकाराच्या जागी अहंकार उभा राहतो, तेव्हा नागरिकांचा विश्वास डळमळीत होऊ लागतो.

## सल्फ्युरिक ॲसिड प्लांट–३ राष्ट्राला समर्पित

**पारादीप, ओडिशा (दै. आरंभ पर्व)**

Amit Shah यांनी आज Indian Farmers Fertiliser Cooperative Limited (IFFCO) च्या पारादीप युनिटमधील नव्याने उभारण्यात आलेल्या सल्फ्युरिक ॲसिड प्लांट–३ (SAP–III) चे राष्ट्राला समर्पण केले. या प्रकल्पाच्या कार्यान्वयनामुळे भारताच्या खत उत्पादन पायाभूत सुविधांना बळकटी मिळणार असून देशातील शेतकरी समुदायाला मोठा फायदा होणार आहे. सुमारे ७०० कोटी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात आलेल्या या सल्फ्युरिक ॲसिड प्रकल्पाची दैनंदिन उत्पादन क्षमता सुमारे २,००० मेट्रिक टन इतकी आहे. या प्रकल्पामुळे पारादीप संकुलाची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार असून हे संकुल भारतातील सर्वात मोठ्या एकात्मिक फॉस्फेटिक खत उत्पादन केंद्रांपैकी एक आहे. या समर्पण सोहळ्यास Mohan Charan Majhi, Dharmendra Pradhan, Dilip Sanghani, K. J. Patel यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच संसद सदस्य, राज्यातील मंत्री, भारत सरकार आणि ओडिशा सरकारचे वरिष्ठ अधिकारी तसेच सहकार क्षेत्रातील प्रतिनिधी कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी बोलताना Amit Shah यांनी भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यात सहकार क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, IFFCO सारख्या संस्थांनी देशभरातील लाखो शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यात मोठे योगदान दिले आहे.

## धायरीत तिथीनुसार शिवजयंती उत्साहात साजरी

*अश्वारूढ शिवमूर्ती ठरली आकर्षण, शिवभक्तांना लाडू वाटप*

**धायरी (पुणे): (दै. आरंभ पर्व)**

धायरी परिसरात तिथीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात आणि शिवमय वातावरणात साजरी करण्यात आली. वेंकटसाई होंडा, न्यू आर्या फाउंडेशन तसेच सुहास बापू चाकणकर मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने वेंकटसाई होंडा शोरूम येथे या शिवजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, शिवभक्त आणि युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याची आकर्षक उभारणी करण्यात आली होती. भव्य सजावट, रोषणाई आणि भगव्या पताकांनी सजलेल्या परिसरामुळे संपूर्ण धायरी परिसर शिवमय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. उभारण्यात आलेल्या भव्य अश्वारूढ शिवमूर्तीने सर्वांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

यावेळी शिवभक्तांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. "जय भवानी, जय शिवाजी" च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित शिवभक्तांना लाडू वाटप करण्यात आले. हा उपक्रम गेल्या तेरा वर्षांपासून अखंडपणे राबवला जात असून दरवर्षी अधिक उत्साहाने शिवजयंती साजरी केली जाते. या माध्यमातून तरुण पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची, स्वराज्यनिष्ठेची आणि धैर्याची प्रेरणा मिळावी हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

कार्यक्रमात माता-भगिनींनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. अनेकांनी पारंपरिक वेशभूषेत येत शिवरायांना अभिवादन केले. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या उत्सवात सहभागी होत शिवजयंतीचा आनंद साजरा केला.

या कार्यक्रमास नगरसेविका कोमल सारंग नवले यांच्यासह प्राज भिलारे, दिपक चव्हाण, संतोष कदम, सनी चाकणकर, विक्रम चाकणकर, संदीप चाकणकर, स्वप्निल गायकवाड, संतोष निंबाळकर, धरमसिंग तसेच परिसरातील अनेक नागरिक आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजपुताना स्टेनलेस लिमिटेडचा २५५ कोटी रुपयांचा आयपीओ ९ मार्चपासून खुला

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

स्टेनलेस स्टील उत्पादन क्षेत्रातील आघाडीची कंपनी राजपुताना स्टेनलेस लिमिटेड सुमारे २५४.९८ कोटी रुपयांचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (IPO) घेऊन भांडवली बाजारात प्रवेश करत आहे. हा आयपीओ ९ मार्च २०२६ रोजी गुंतवणुकीसाठी खुला होणार असून ११ मार्च २०२६ रोजी बंद होईल. कंपनीने प्रति शेअर ११६ ते १२२ रुपये असा किंमत पट्टा निश्चित केला आहे. गुंतवणूकदारांना किमान ११० शेअर्स आणि त्याच्या पटीत अर्ज करता येणार आहे. किरकोळ गुंतवणूकदारांसाठी किमान गुंतवणूक सुमारे १३,४२० रुपये असेल. शेअर्सचे वाटप १२ मार्च रोजी होण्याची शक्यता असून १६ मार्च २०२६ रोजी हे शेअर्स बीएसई आणि एनएसईवर सूचीबद्ध होण्याची अपेक्षा आहे. या आयपीओसाठी निर्भय कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड हे बुक रनिंग लीड मॅनेजर असून केफिन टेक्नॉलॉजी लिमिटेड रजिस्ट्रार म्हणून काम पाहत आहे.



२५५ कोटी रुपयांच्या या सार्वजनिक इश्यूमध्ये १७८.७३ कोटी रुपयांचे १.४७ कोटी शेअर्स फ्रेश इश्यू म्हणून जारी केले जातील, तर ७६.२५ कोटी रुपयांचे शेअर्स ऑफर फॉर सेल (OFS) अंतर्गत प्रमोटर्सकडून विकले जातील. कंपनी या निधीचा वापर व्यवसाय विस्तारासाठी करणार आहे. यामध्ये स्टेनलेस स्टील सीमलेस पाईप्ससाठी नवीन उत्पादन युनिट उभारण्यासाठी १८.५७ कोटी रुपयांची गुंतवणूक तसेच ९८ कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज कमी करण्यासाठी निधीचा वापर केला जाणार आहे.

१९९१ मध्ये स्थापन झालेली राजपुताना स्टेनलेस लिमिटेड ही स्टेनलेस स्टीलच्या लांब आणि सपाट उत्पादनांमध्ये अनुभवी कंपनी आहे. गुजरातमधील कलोल येथे ३५,१९६ चौरस मीटर परिसरात तिचे आधुनिक उत्पादन युनिट असून त्यात इंडक्शन फर्नेस, एओडी, सीसीएम आणि रोलिंग मिलसारख्या अत्याधुनिक सुविधा आहेत.

कंपनी आरएसएल (RSL) या ब्रँडअंतर्गत बिलेट्स, फोर्जिंग इनगॉट्स, रोल्ड ब्लॅक बार, रोल्ड ब्राइट बार, फ्लॅट्स, कॉइल्स यांसह विविध स्टेनलेस स्टील उत्पादने तयार करते. ही उत्पादने ८० हून अधिक स्टेनलेस स्टील ग्रेडमध्ये उपलब्ध असून सीमलेस पाईप्स, फोर्जिंग, अभियांत्रिकी, कास्टिंग, फास्टनर्स, पंप, शाफ्ट आणि ऑटोमोटिव्ह उद्योगांमध्ये वापरली जातात. भारतीय बाजारपेठेसोबतच कंपनी अमेरिका, यूएई, तुर्की, कुवेत आणि पोलंड यांसारख्या देशांमध्येही निर्यात करते. एरोस्पेस, संरक्षण, ऑटोमोटिव्ह, विमानचालन आणि तेल-वायू क्षेत्रांमध्ये तिच्या उत्पादनांचा कच्चा माल म्हणून वापर होतो. सप्टेंबर २०२५ पर्यंत कंपनीमध्ये ४०० हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत.




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
रविवार, दि. ०८ मार्च २०२६









## थोडक्यात पण महत्वाचे




### भांडगावच्या भक्तामर कलश तीर्थावर भव्य पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव

पुणे (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील भांडगाव (यवत) येथील भक्तामर कलश तीर्थ येथे ११ ते १५ मार्च २०२६ या कालावधीत '१००८ आदिजिन पंचमेरू मानस्तंभ पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवा'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. भक्तामर कलश तीर्थ परिसरात कलशाकार मंदिर, नवग्रह रत्नमय प्रतिमा, नद्यावर्तात १०८ आदिनाथ जिन प्रतिमा, भक्तामर ध्यान केंद्र व हीलिंग सेंटर, भक्तामर शास्त्र मानस्तंभ, महाद्वार, नवधा भक्ति भोजनालय, संत निवास व यात्रेकरू विश्रामालय, आरोग्य धाम (अस्पताल) तसेच पूजन साहित्य उपलब्ध करून देणारे भांडार अशा विविध सुविधा उभारण्यात आल्या आहेत. या महोत्सवाच्या यानिमित्ताने दिगंबर जैन राष्ट्रसंतांसह अनेक आचार्य, उपाध्याय, साधू-साध्वींचा दुर्मिळ संतसमागम येथे होणार आहे. महोत्सवात १२ मार्च रोजी दुपारी १ वाजता 'भक्तामर ज्योतिष सम्मेलन', १४ मार्च रोजी दुपारी १ वाजता 'भक्तामर हीलर महोत्सव' तसेच ४८००० मीटर हस्तलिखित भक्तामर वस्त्रांची विशेष झांकी सादर केली जाणार आहे. याशिवाय 'जैन अल्पसंख्याक योजना – सरकारी योजना आणि संधी' या विषयावर ऑल इंडिया जैन मायनॉरिटी फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष ललित गांधी मार्गदर्शन करणार आहेत. तसेच अमेरिकेतून पूर्वा सारंग शहा निर्मित भक्तामरवर चित्रफितीचे सादरीकरण होणार आहे. या महोत्सवासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, छगन भुजबळ, खासदार डॉ. अमोल कोल्हे, राजू शेट्टी, आमदार राहुल कुल यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांना विशेष निमंत्रण देण्यात आल्याची माहितीही यावेळी पत्रकार परिषदेत देण्यात आली.

### ९ हजार अंगणवाडी व आशा सेविकांना 'पीएफ' मिळण्याचा मार्ग मोकळा

सिंहगड (आरंभ पर्व) : Centre of Indian Trade Unions (सिटू) पुणे जिल्हा समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे पुणे जिल्ह्यातील सुमारे ९ हजार अंगणवाडी सेविका व आशा कर्मचारी यांना भविष्य निर्वाह निधी (PF) मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे दीर्घकाळापासून सामाजिक सुरक्षा सुविधांपासून वंचित असलेल्या अंगणवाडी व आशा सेविकांना मोठा दिलासा मिळणार आहे. सिटूच्या पदाधिकाऱ्यांनी या संदर्भात वेळोवेळी Pune Zilla Parishad प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. सिटूच्या नेतृत्वाखाली कामगार संघटनांनी विविध बैठका, निवेदने आणि आंदोलने करून अंगणवाडी व आशा सेविकांना पीएफचा लाभ मिळावा अशी मागणी केली होती. अखेर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतल्याने आता या कर्मचाऱ्यांना पीएफ मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील हजारो महिला कर्मचाऱ्यांना आर्थिक सुरक्षितता मिळणार असून कामगार संघटनांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. तसेच उर्वरित प्रलंबित मागण्यांबाबतही लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी सिटूच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

# जळगाव आरटीओच्या टेस्ट ट्रॅकवरील सुविधांचा अभाव

## मनसेचे निवेदन, आंदोलनाचा इशारा




**जळगाव (दै. आरंभ पर्व)**

जळगाव शहरापासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर असलेल्या प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) वाहन फिटनेस आणि कायमस्वरूपी लायसन्स चाचणी ट्रॅकवर नागरिकांना मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. या संदर्भात मनसेच्या वतीने प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. सध्या जिल्ह्यात उन्हाचा कडाका वाढला असून उष्णतेची लाट जाणवत आहे. अशा परिस्थितीत दररोज शेकडो नागरिक आणि वाहन चालक विविध कामांसाठी या ट्रॅकवर येत असतात. मात्र त्या ठिकाणी पिण्याचे पाणी, सावलीत बसण्यासाठी शेड तसेच स्वच्छतागृह यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ट्रॅकवर येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय नसल्याने त्यांना पाण्यासाठी मोठी धावपळ करावी लागते. तसेच चाचणीसाठी तासनतास थांबणाऱ्या नागरिकांना बसण्यासाठी सावलीची वेटिंग शेड नसल्याने कडक उन्हात उभे राहावे लागते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याचीही तक्रार करण्यात आली आहे. याशिवाय महिला आणि पुरुषांसाठी स्वच्छतागृहांची व्यवस्था नसल्याने मोठी गैरसोय होत असल्याचेही मनसेने निदर्शनास आणून दिले. हा परिसर शहरापासून दूर असल्याने आपत्कालीन परिस्थितीत मदत मिळवणेही कठीण होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

मनसेने प्रशासनाकडे तातडीने पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करणे, नागरिकांसाठी प्रशस्त व सावलीची शेड उभारणे तसेच फिरते किंवा कायमस्वरूपी स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. या मागण्यांची आठ दिवसांत पूर्तता न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेना तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष ॲड. जमील देशपांडे, उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, राजेंद्र निकम, ललित शर्मा, खुशाल ठाकूर, युसुफ खाटीक, अश्फाक शहा, अली खाटीक यांच्यासह महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

## IKEA आता पुणेकरांच्या भेटीला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जगभरातील ग्राहकांमध्ये प्रसिद्ध असलेली स्वीडनची प्रसिद्ध होम फर्निचर कंपनी IKEA आता पुणेकरांच्या घरांत आणि मनात स्थान मिळवण्यासाठी सज्ज झाली आहे. १२ मार्च रोजी पुण्यातील विमान नगर येथील फिनिक्स मॉलमध्ये IKEA आपले पहिले सिटी स्टोअर सुरु करत आहे. या नवीन स्टोअरमुळे पुणेकरांना आता त्यांच्या घराजवळच जागतिक दर्जाची आकर्षक फर्निचर उत्पादने आणि घराच्या सजावटीचे नवनवीन पर्याय अनुभवता येतील. आता पुणेकरांनाही जागतिक दर्जाची घरगुती सजावटीची उत्पादने खरेदी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सुमारे ३२ हजार square feet या विस्तीर्ण जागेवर हे स्टोअर उभारले गेले आहे. मोकळ्या जागेमुळे या




स्टोअरला भेट देणाऱ्या ग्राहकांना आपल्या घरासाठी आवश्यक वस्तू सहजपणे पाहता येईल. फर्निचर प्रत्यक्षात पाहता येत असल्याने खरेदी करणेही आता सोयीचे होणार आहे. उत्कृष्ट डिझाइन, उत्तम दर्जा आणि परवडणाऱ्या किंमतीत होम फर्निशिंग उत्पादने पुणेकरांच्या नजीकच्या ठिकाणी उपलब्ध करुन देणे, हा या स्टोअरच्या उभारणीमागील कंपनीचा मुख्य उद्देश आहे.

## मावळ-मुळशीतील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या पाठीशी पक्ष ठाम






**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मावळ व मुळशी तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविलेल्या उमेदवारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी तालुक्यातील नागरी समस्या आणि प्रश्न हातात घेऊन पक्ष संघटनेला अधिक बळकट करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीरंग चव्हाण-पाटील, ज्येष्ठ नेते कमलाकर सातव, प्रदेश प्रतिनिधी आकाश मोरे, शंकरराव दांगट, संदीप नायकरे, चंद्रकांत गोरे, संजय अभंग, आनंद पवार, मावळ तालुकाध्यक्ष यशवंत मोहोळ, कार्याध्यक्ष गोपाळ तंतरपाळे, संपर्क प्रमुख राजू शिंदे, उपाध्यक्ष राजीव फलके, मुळशी तालुकाध्यक्ष सुरेश पारखी, उपाध्यक्ष सतीश चांदेरे, अशोक मातेरे, प्रदीप जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष श्रीरंग चव्हाण-पाटील यांनी सांगितले की, धनशक्ती विरुद्ध जनशक्तीच्या लढाईत काँग्रेसचे उमेदवार लोकशाही टिकवण्यासाठी निवडणुकीच्या मैदानात उतरले. प्रतिकूल परिस्थितीत लढलेल्या सर्व कार्यकर्त्यांच्या पाठीशी काँग्रेस पक्ष कायम ठामपणे उभा राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## कुडजे–बहुली भागात कमी दाबाचा वीजपुरवठा

### डीपी बसवण्यास विलंब, शिवसेनेचा आंदोलनाचा इशारा

**सिंहगड (दै. आरंभ पर्व)**

कुडजे ते बहुली या परिसरात मागील अनेक वर्षांपासून कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून नवीन DP बसवण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे. या समस्येकडे वारंवार लक्ष वेधूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने शिवसेना खडकवासला मतदारसंघातर्फे लवकरच आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या भागात दोन ते तीन वर्षांपासून नवीन DP बसवण्याची मागणी केली जात आहे. संबंधित विभागाकडून DP मंजूर असल्याचे सांगितले जाते; मात्र जिल्हा नियोजनमधून प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे ती बसवता येत नसल्याची माहिती दिली जात आहे. गेल्या वर्षभरापासून हीच परिस्थिती कायम आहे.

कमी व्होल्टेजमुळे परिसरातील नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. गिरण्या, फ्रीजसारखी घरगुती उपकरणे नीट चालत नाहीत. इलेक्ट्रिक वाहने चार्ज होत नाहीत, तसेच बोअरवेल व शेतीसाठी वापरले जाणारे पाण्याचे पंप सुरू होत नसल्याने शेतकऱ्यांची पिके धोक्यात आली आहेत.

दरम्यान, परिसरात मोठ्या प्रमाणावर नवीन फार्महाऊस प्रकल्प उभे राहत असून त्यांना तातडीने DP उपलब्ध करून दिली जाते. मात्र सर्वसामान्य नागरिकांना वीजेच्या मूलभूत सुविधांसाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. याशिवाय रिंगरोडच्या कामामुळे या भागातील वीजेचा लोड वाढत असल्याचेही सांगितले जात आहे.

काही गावांमध्ये पाणीपुरवठा योजना पूर्ण असूनही कमी व्होल्टेजमुळे नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी देता येत नसल्याची समस्या निर्माण झाली आहे. या सर्व बाबींकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नितीन वाघ, रामदास गायकवाड, पप्पू गायकवाड, तुषार गायकवाड, अजित पायगुडे व माऊली भगत यांनी दिला आहे.




# रुग्ण हक्क परिषदेचा शिवसन्मान पुरस्कार प्रेरणादायी

## भानुप्रताप बर्गे यांचे मत; शिवजयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांना 'शिवसन्मान पुरस्कार' प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

तळागाळात काम करणाऱ्या, गरिबांची मदत करणाऱ्या, निस्वार्थी समाजसेवा करणाऱ्या तसेच विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या मान्यवरांचा रुग्ण हक्क परिषद दरवर्षी शिवसन्मान पुरस्कार देऊन गौरव करते. रुग्ण हक्क परिषदेचा हा शिवसन्मान पुरस्कार अनेकांना समाजकार्यासाठी प्रेरणा देणारा आहे, असे मत माजी सहाय्यक पोलीस आयुक्त भानुप्रताप बर्गे यांनी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त लालमहल येथे आयोजिलेल्या शिवसन्मान पुरस्कार वितरण सोहळ्यात भानुप्रताप बर्गे बोलत होते. प्रसंगी रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण, माजी विशेष पोलीस महानिरीक्षक चंद्रशेखर दैठणकर, सह्याद्री हॉस्पिटलचे उपाध्यक्ष



सचिन कुलकर्णी, प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक भारत देसडला, डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटलचे मुख्य अधीक्षक डॉ. हनुमंत चव्हाण, राजाभाऊ कदम, लहुजी शक्ती सेनेचे अमोल चव्हाण, गोविंद साठे आदी उपस्थित होते.

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रुग्ण हक्क परिषदेच्या वतीने या सोहळ्यात उद्योग, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, सांस्कृतिक, राजकीय, विधी व न्याय तसेच क्रीडा अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १०१ मान्यवरांचा लाल महल येथे शिवसन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. मानचिन्ह, पुस्तक, उपरणे आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

यामध्ये अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे कोषाध्यक्ष अनिल गुंजाळ, माजी शासकीय अधिकारी देवेंद्र दलाल, युवा पत्रकार राधिका वळसे पाटील, सज्जद सय्यद, अनिल खुडे, दैनिक आरंभपर्व पुणेचे निवासी संपादक लक्ष्मण साबळे, दलित पँथरच्या प्रदेशाध्यक्ष स्नेहा माने, ह.भ.प. विष्णु महाराज चामनर, हरजीवन हॉस्पिटलचे डॉ. सागर रोकडे, आदर्श शिक्षिका राखी रासकर, गायिका शिल्पा पांचाळ, नगरसेवक निलेश आल्हाट, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संजय भंडारे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे शासकीय अधिकारी शितल फत्तेपुरे, समर्थ सुरवसे, सामाजिक कार्यकर्ते शिवराज माळवदकर, तृतीयपंथी कार्यकर्त्या प्रीती लाटे, भाकर फाउंडेशन मुंबईचे ॲड. दीपक सोनवणे यांच्यासह विविध क्षेत्रातील १०१ मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

उमेश चव्हाण म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी आणि न्यायासाठी दिलेली प्रेरणा समाजासाठी मार्गदर्शक आहे. त्याच विचारातून रुग्ण हक्क परिषद आरोग्य क्षेत्रात सर्वसामान्यांना न्याय मिळावा यासाठी सातत्याने काम करत आहे.

समाजासाठी निस्वार्थीपणे काम करणाऱ्या व्यक्तींना शिवसन्मान पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्याचा उद्देश असून, यामुळे समाजातील इतरांनाही प्रेरणा मिळते."

समाजासाठी सकारात्मक काम करणाऱ्या व्यक्तींना अशा प्रकारे व्यासपीठ मिळावे आणि त्यांच्या कार्याची दखल घेतली जावी, यासाठी हा उपक्रम सातत्याने राबविला जात असल्याचे त्यांनी सांगितले. शिवसन्मान पुरस्काराचे आयोजन रुग्ण हक्क परिषदेच्या पुणे शहराध्यक्ष अपर्णा मारणे साठ्ये यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजित राजे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. मंदार सावजी यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### संकल्प इंटरनॅशनल स्कूलमध्ये ‘राष्ट्रीय विज्ञान दिन’ उत्साहात साजरा

पुणे (आरंभ पर्व) : नऱ्हे मानाजीनगर येथील संकल्प इंटरनॅशनल स्कूलमध्ये ‘राष्ट्रीय विज्ञान दिन’ मोठ्या उत्साहात आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. भारतीय शास्त्रज्ञ सर सी. व्ही. रमण यांनी शोधलेल्या ‘रमण इफेक्ट’च्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या निमित्ताने शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जा, कचरा व्यवस्थापन, जलशुद्धीकरण आणि रोबोटिक्स यांसारख्या विषयांवर आधारित आकर्षक वैज्ञानिक मॉडेल्स आणि प्रकल्प सादर केले. या विज्ञान प्रदर्शनाने उपस्थित पालक आणि शिक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. तसेच विद्यार्थ्यांनी वर्गात शिकलेल्या विज्ञानाच्या संकल्पना साध्या आणि रंजक प्रयोगांद्वारे प्रत्यक्ष दाखवून दिल्या. ‘विज्ञान आणि तंत्रज्ञान : शाश्वत भविष्यासाठी’ या विषयावर भित्तीपत्रक स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी तयार केलेली आकर्षक पोस्टर्स सर्वांच्या कौतुकास पात्र ठरली. यावेळी शाळेच्या संचालिका सौ. राधिका गिरमे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना सांगितले की, “आजचे युग हे विज्ञानाचे युग आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न घेता विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारण्याची आणि प्रयोग करण्याची सवय लावून घेतली पाहिजे. संकल्प इंटरनॅशनल स्कूल अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला नेहमीच प्रोत्साहन देत असते.” या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल उत्सुकता वाढली असून कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

### टिळ्यावरून वाद; गैरसमजामुळे निर्माण झाला तणाव

भोर (आरंभ पर्व) : भोर तालुक्यातील न्हावी येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या कपाळावर टिळा लावण्याबाबत गैरसमज निर्माण झाल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेची माहिती मिळताच काही हिंदुत्ववादी कार्यकर्ते शाळेत दाखल झाले आणि शाळा प्रशासनाकडे याबाबत स्पष्टीकरण मागितले. मिळालेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांनी टिळा लावून शाळेत येऊ नये असे मुख्याध्यापकांनी सांगितल्याची चर्चा परिसरात पसरली होती. या पार्श्वभूमीवर काही कार्यकर्त्यांनी शाळेत जाऊन याबाबत नाराजी व्यक्त करत प्रशासनाकडे जाब विचारला. त्यामुळे काही काळ शाळा परिसरात गोंधळाची स्थिती निर्माण झाली. दरम्यान, मुख्याध्यापकांनी या प्रकरणावर स्पष्टीकरण देताना विद्यार्थ्यांना टिळा लावण्यास कोणताही विरोध केलेला नसून हा केवळ गैरसमज असल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या या भूमिकेनंतर वातावरण शांत झाले. या घटनेनंतर शाळा परिसरात काही काळ चर्चा रंगल्या असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता शांतता आणि सौहार्द कायम राखण्याचे आवाहन केले आहे.

### फटाके वाजवणाऱ्या बुलेटचा त्रास; कारवाईची नागरिकांची मागणी

सिंहगड (आरंभ पर्व) : हवेली तालुक्यातील सिंहगड – खडकवासला परिसरात फटाक्यांसारखा मोठा आवाज करणाऱ्या बुलेट मोटारसायकलींचा त्रास दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. बदल केलेल्या सायलेंसरमुळे निर्माण होणारा कर्णकर्कश आवाज परिसरातील शांततेला बाधा पोहोचवत असून यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही युवक मोटारसायकलींमध्ये जाणीवपूर्वक बदल करून मोठ्या आवाजाचे सायलेंसर बसवत आहेत. या सायलेंसरमधून फटाक्यांसारखा आवाज होत असल्याने परिसरातील रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः निवासी वसाहती, शाळा-महाविद्यालय परिसर, रुग्णालये व दवाखाने येथे या आवाजामुळे रुग्ण, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना मानसिक तसेच शारीरिक त्रास होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे परिसरात ध्वनीप्रदूषण वाढत असून सार्वजनिक शांततेचा भंग होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

### नवले ब्रीजजवळ अपघात; कंटेनर कलंडला, तिघे गाडीत अडकले

पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड रोड परिसरातील नवले ब्रीजजवळ आज सायंकाळी भीषण अपघात घडला असून भरधाव कंटेनर थेट कारवर कोसळल्याने कारमधील तिघेजण गाडीत अडकले आहेत. सुदैवाने ते तिघेही जिवंत असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कंटेनर आणि होंडा ॲमेझ ही दोन्ही वाहने पुण्याकडे येत होती. नवले ब्रीज परिसरात उतार असल्याने कंटेनरचा वेग जास्त होता. अचानक ब्रेक न लागल्याने कंटेनर चालकाचा ताबा सुटला आणि कंटेनर उजव्या बाजूला कलंडत थेट होंडा ॲमेझ कारवर पडला. या धडकेत कार पूर्णपणे चिरडली गेली. अपघाताचा जोर इतका होता की ब्रेक लावण्याच्या प्रयत्नात दोन्ही वाहने फिरत सातारा दिशेकडे वळली. कारमधील तिघेजण गंभीररीत्या अडकले असून गाडी मोठ्या प्रमाणात दबली असल्याने त्यांना बाहेर काढणे अत्यंत कठीण झाले आहे. अपघातानंतर परिसरात मोठी गर्दी झाली असून स्थानिक नागरिक मदतीसाठी धावले आहेत. पोलिस व आपत्कालीन यंत्रणांना माहिती देण्यात आली असून बचावकार्य सुरू करण्याची तयारी सुरू आहे. दरम्यान, नवले ब्रीज परिसरात वारंवार अपघात होत असल्याने या मार्गाला नागरिकांकडून “शापित नवले ब्रीज” असे संबोधले जात असून पुन्हा एकदा भीषण अपघाताने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कनिष्ठ व वरिष्ठ सहाय्यक लिपीक पदे एकत्र करण्याची मागणी

## मंत्री जयकुमार गोरे यांच्याशी लिपीक संघटनेची बैठक



**दौंड (दै. आरंभ पर्व)**

जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कनिष्ठ सहाय्यक आणि वरिष्ठ सहाय्यक लिपीक पदे एकत्र करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपिक वर्गीय संघटनेने ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली. यासंदर्भात ५ मार्च २०२६ रोजी मंत्रालयात मंत्री गोरे यांच्या दालनात बैठक पार पडली.

बैठकीदरम्यान संघटनेचे राज्य कोषाध्यक्ष उमाकांत सूर्यवंशी यांनी ही मागणी मांडली. त्यांनी सांगितले की, सध्याच्या संगणकीय युगात कनिष्ठ व वरिष्ठ लिपीकांच्या कामकाजात कोणताही फरक उरलेला नाही. दोन्ही पदांवरील कर्मचाऱ्यांचे काम जवळपास समान झाले आहे. तसेच कनिष्ठ सहाय्यक लिपीकांसाठी शैक्षणिक अर्हता अधिक असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्यामुळे दोन्ही पदांचे एकत्रीकरण करण्याबाबत शासनाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवून निर्णय घ्यावा, अशी विनंती त्यांनी केली.

यापूर्वीही मंत्री जयकुमार गोरे यांच्यासोबत लिपीक संघटनेच्या दोन बैठका झाल्या होत्या. संघटनेच्या मागणीनुसार सहाय्यक प्रशासन अधिकारी व कनिष्ठ प्रशासन अधिकारी ही पदे एकत्र करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवण्यात आल्याबद्दल संघटनेचे राज्याध्यक्ष सागर बाबर यांनी मंत्री गोरे यांचे आभार मानले. तसेच हा प्रस्ताव लवकर मंजूर करण्यासाठी वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्याची विनंती त्यांनी केली.

यावेळी वरिष्ठ सहाय्यक लिपीक पदांच्या विभागीय स्पर्धा परीक्षेत निवड झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाज्येष्ठतेसाठी परीक्षेच्या दुसऱ्या दिवसाच्या लगतची तारीख ग्राह्य धरण्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. यावर ग्रामविकास विभागाने सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी, असे निर्देश मंत्री गोरे यांनी दिले.

या बैठकीसाठी शिराळा विधानसभा मतदारसंघाचे आमदार सत्यजित देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी सांगितले की, जिल्हा परिषदांमधील कनिष्ठ व वरिष्ठ सहाय्यक लिपीकांच्या कामाच्या स्वरूपात कोणताही फरक राहिलेला नाही. त्यामुळे काळानुरूप त्यांच्या सेवाशर्तींमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. यामुळे कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या अधिक संधी मिळतील आणि ग्रामीण भागातील सेवा अधिक परिणामकारकपणे देता येतील.

दरम्यान, मागण्यांसाठी बैठका घेण्याबरोबरच कामबंद करून सामान्य जनतेला वेठीस धरले जाणार नाही, याची खबरदारी घेण्याचा इशाराही मंत्री जयकुमार गोरे यांनी दिला. कामबंद आंदोलन केल्यास ‘काम नाही तर वेतन नाही’ या तत्वावर कारवाई केली जाईल, असा सज्जड दम त्यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिला.

या बैठकीस संघटनेचे राज्याध्यक्ष सागर बाबर, राज्य कार्याध्यक्ष पंकज गुल्हाने, राज्य उपाध्यक्ष संजय चव्हाण, मराठवाडा विभागीय अध्यक्ष संजय जगताप, राज्य प्रसिद्धी प्रमुख हेमंतकुमार यावले, राज्य सचिव अरुण जोर्वेकर, राज्य कोषाध्यक्ष उमाकांत सूर्यवंशी, नाशिक जिल्हाध्यक्ष प्रमोद निरगुडे, पुणे जिल्हाध्यक्ष इंद्रजीत जाधव, पुणे जिल्हा कोषाध्यक्ष रेव्हलिंग यादव, सांगली जिल्हा कोषाध्यक्ष महेश गावंदरे, जिल्हा संघटक संजय शिंदे उपस्थित होते. तसेच ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, उपसचिव जाधव मॅडम, कक्ष अधिकारी नितीन पवार यांच्यासह विभागाचे अन्य अधिकारी उपस्थित होते.

## योगेश माळी यांना १५ दिवस साधा कारावास

- १०, ५०० दंड न भरल्याने थेट कारागृहात रवानगी


**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दारू पिऊन वाहन चालविण्याच्या गंभीर गुन्ह्यात दोषी ठरलेल्या आरोपीला न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावली आहे. मोटार वाहन न्यायालय, पुणे येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस.बी.पाटील यांनी फिर्याद खटला नंबर १६८८७५/२०२५ या प्रकरणात आरोपी योगेश देवीदास माळी यास दिनांक ०२ मार्च २०२६ रोजी दोषी ठरवून कारावास व दंडाची शिक्षा सुनावली. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार, आरोपीस मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम १८५ (दारू पिऊन वाहन चालविणे) अन्वये १५ दिवस साधा कारावास व ₹१० हजार द्रव्यदंड ठोठावण्यात आला आहे. सदर दंड न भरल्यास १० दिवस साधा कारावास अशी अतिरिक्त शिक्षा निश्चित करण्यात आली आहे. तसेच, कलम १३०(१)/१७७ अन्वये केलेल्या अपराधासाठी आरोपीस ₹५००/- द्रव्यदंड व तो न भरल्यास ०१ दिवस साधी कैद, अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे. न्यायालयात एकूण रूपये १० हजार ५०० इतकी दंड रक्कम आरोपीने भरली नसल्याने, सपुर्दगी वॉरंट काढण्यात येऊन आरोपीस येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## प्राजक्ता गायकवाड ट्रोल; ओमचा ट्रोलर्सना सवाल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**


स्वराज्यरक्षक संभाजी मालिकेत महाराणी येसूबाईची भूमिका साकारून घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री प्राजक्ता गायकवाड सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली आहे. मात्र यावेळी तिच्या अभिनयामुळे नव्हे, तर तिच्या नव्या हेअरस्टाइलमुळे ती चर्चेत आली आहे.



अलीकडेच प्राजक्ताने सोशल मीडियावर काही फोटो आणि व्हिडिओ शेअर केले. या व्हिडिओमध्ये ती नव्या हेअरस्टाइलमध्ये दिसत असून तिचा हा लूक काही चाहत्यांना आवडला नाही. त्यामुळे सोशल मीडियावर तिला ट्रोलिंगचा सामना करावा लागला. काही नेटिझन्सनी तिच्या हेअरस्टाइलबाबत टीका करत “हे काय कोंबड्याच्या पिसांसारखं?”, “केसांना पंख लावलेत का?” तसेच “हा लूक अजिबात शोभत नाही” अशा प्रतिक्रिया दिल्या. या ट्रोलिंगदरम्यान प्राजक्ताचा भाऊ ओम यादव तिच्या पाठीशी ठामपणे उभा राहिला. त्याने सोशल मीडियावर पोस्ट करत ट्रोलर्सना सडेतोड उत्तर दिले. प्राजक्ता ही एक स्वतंत्र आणि मेहनती अभिनेत्री असून तिने स्वतःच्या कष्टावर आपले स्थान निर्माण केले आहे, असे त्याने स्पष्ट केले. एखाद्या कलाकाराच्या वैयक्तिक निवडीवरून अशा प्रकारे टीका करणे योग्य नसल्याचेही त्याने नमूद केले. दरम्यान, स्वराज्यरक्षक संभाजी मालिकेत येसूबाईची भूमिका साकारल्यानंतर प्राजक्ता गायकवाडला प्रेक्षकांचे प्रचंड प्रेम मिळाले. त्यामुळे तिचा मोठा चाहतावर्ग तयार झाला आहे. मात्र सध्या तिच्या नव्या लूकमुळे सोशल मीडियावर चर्चा रंगताना दिसत आहे.

## महिलांसाठी सुरक्षित डिजिटल संवादाला नवा अर्थ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**




### एफआरएनडीची ‘सुरक्षित कन्व्हर्झेशन्स’ मोहीम सुरू

महिलांसाठी सुरक्षित डिजिटल संवादाची संकल्पना बळकट करण्यासाठी भारतातील अवतार-आधारित ऑडिओ सोशल डिस्कव्हरी प्लॅटफॉर्म एफआरएनडी (FRND) ने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त ‘सुरक्षित कन्व्हर्झेशन्स’ ही मोहीम सुरू केली आहे. या उपक्रमाद्वारे महिलांसाठी सुरक्षित आणि आदरयुक्त डिजिटल संवादाचे वातावरण निर्माण करण्यावर भर देण्यात आला आहे.

भारतामध्ये इंटरनेट वापरकर्त्यांची वाढ विशेषतः टियर-२ ते टियर-४ शहरांमधून होत असताना डिजिटल सुरक्षितता हा विश्वासाचा महत्त्वाचा घटक ठरत आहे. महिलांना सुरक्षित आणि अर्थपूर्ण संवाद साधता यावा, या उद्देशाने एफआरएनडीने महिला-प्रथम सुरक्षा डिझाइनवर आधारित अनेक वैशिष्ट्ये विकसित केली आहेत.

या मोहिमेअंतर्गत डिजिटल सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी इन-ॲप सुरक्षा सत्रे आयोजित केली जाणार आहेत. तसेच वापरकर्त्यांना गरज पडल्यास तातडीने मदत मिळावी यासाठी २४×७ टोल-फ्री हेल्पलाइनही सुरू करण्यात येणार आहे. हा उपक्रम भारत सरकारच्या सुरक्षित आणि समावेशक डिजिटल परिसंस्था निर्माण करण्याच्या उद्दिष्टाशी सुसंगत असल्याचे कंपनीने सांगितले. एफआरएनडी प्लॅटफॉर्मवर दररोज जवळपास १० लाख संभाषणे होत असून त्यासाठी १०० सदस्यांची मॉडरेशन टीम आणि रिअल-टाइम एआय प्रणाली कार्यरत आहे. सार्वजनिक रूममधील लाईव्ह मॉडरेशन तसेच खाजगी संवादांमधील एआय-आधारित तपासणीद्वारे गैरवापर होण्यापूर्वीच त्यावर नियंत्रण ठेवले जाते.


महिला वापरकर्त्यांसाठी या प्लॅटफॉर्मवर विशेष सुरक्षा केंद्र उपलब्ध असून त्याद्वारे संशयास्पद वापरकर्त्यांना इशारा देणे, हटवणे किंवा ब्लॉक करणे शक्य होते. तसेच गोपनीयतेचे रक्षण करण्यासाठी व्हिडिओ कॉल दरम्यान स्क्रीन रेकॉर्डिंग आणि चॅट स्क्रीनशॉट घेण्यास बंदी आहे.

इंटरॅक्ट ग्रुपचे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी भानू प्रताप सिंह तंवर म्हणाले, “भारतामध्ये सोशल नेटवर्क्सचा वेगाने विस्तार होत असताना सुरक्षितता ही विश्वासाचा पाया बनली आहे. विशेषतः टियर-२ ते टियर-४ शहरांतील महिलांसाठी इंटरनेटचा पहिला अनुभव सुरक्षित असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे एआय, मॉडरेशन आणि उत्पादन डिझाइन यांचा समन्वय साधून आम्ही महिला-प्रथम सुरक्षा व्यवस्था तयार केली आहे.”

‘सुरक्षित कन्व्हर्झेशन्स’ मोहिमेद्वारे एफआरएनडी सुरक्षित आणि आदरयुक्त डिजिटल वर्तनाला प्रोत्साहन देत आहे. भारतातील डिजिटल समुदाय वाढत असताना सोशल प्लॅटफॉर्मचे भविष्य केवळ संवादांच्या संख्येवर नव्हे, तर त्या संवादांची सुरक्षितता आणि विश्वासार्हता यावर अवलंबून असेल, असा विश्वास कंपनीने व्यक्त केला आहे.


## विवोची V70 आणि V70 एलिटसाठी नवी मोहीम

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**




विवो इंडियाने आपल्या V70 आणि V70 एलिट स्मार्टफोनसाठी नवीन डिजिटल व्हिडिओ मोहीम सुरू केली असून या मोहिमेत ब्रँड ॲम्बेसेडर सिद्धार्थ मल्होत्रा आणि कियारा अडवाणी प्रमुख भूमिकेत दिसत आहेत. जीवनातील महत्त्वाचे आणि संस्मरणीय क्षण साजरे करण्यावर आधारित ही मोहीम प्रीमियम इमेजिंग तंत्रज्ञानाची ताकद अधोरेखित करते. कथाकथनाच्या शैलीत साकारलेल्या या चित्रपटात सिद्धार्थ आणि कियारा त्यांच्या आयुष्यातील खास आठवणी पुन्हा अनुभवताना दिसतात. लग्नापूर्वीचा प्रस्ताव आणि जवळीकपूर्ण समारंभ यांसारख्या भावनिक प्रसंगांमधून आनंद, जवळीक आणि त्या क्षणांची सत्यता प्रभावीपणे सादर करण्यात आली आहे. या मोहिमेद्वारे Vivo V70 आणि V70 Elite हे जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांचे विश्वासार्ह साथीदार म्हणून सादर करण्यात आले आहेत. प्रगत कॅमेरा तंत्रज्ञानामुळे रोजचे साधे क्षणही संस्मरणीय आठवणींमध्ये रूपांतरित होऊ शकतात, असा संदेश या मोहिमेतून देण्यात आला आहे. या स्मार्टफोनमधील ५० एमपी नाईट टेलिफोटो कॅमेरा कमी प्रकाशातही स्पष्ट आणि तपशीलवार पोर्ट्रेट टिपण्यास सक्षम आहे. संध्याकाळच्या कार्यक्रमांमध्ये किंवा मंद प्रकाशातील क्षणांमध्येही हा कॅमेरा उत्कृष्ट स्पष्टता आणि खोली प्रदान करतो. तसेच ४के व्हिडिओ रेकॉर्डिंग सुविधेमुळे वापरकर्त्यांना सिनेमॅटिक दर्जाचे, स्पष्ट आणि सुरळीत व्हिडिओ रेकॉर्ड करता येतात. ही मोहीम विवोच्या प्रीमियम स्मार्टफोन विभागातील वाढत्या उपस्थितीवरही प्रकाश टाकते. भावनिक कथाकथन आणि अत्याधुनिक कॅमेरा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ब्रँड ग्राहकांच्या गरजांनुसार उत्पादन विकासावर भर देत असल्याचे या मोहिमेतून स्पष्ट होते.

# स्त्रियांना बंधनात ठेवण्यात कसला आलाय पुरुषार्थ?



**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

**(दै. आरंभ पर्व)**

समाजाच्या रचनेत स्त्री आणि पुरुष हे दोन्ही समान आणि परस्परपूरक घटक आहेत. तरीही अनेक शतकांपासून स्त्रियांना विविध बंधनांत ठेवण्याची परंपरा समाजात रूढ झाली. घराच्या चार भिंतीतच स्त्रीचे आयुष्य मर्यादित ठेवले गेले, तिच्या स्वप्नांवर आणि इच्छांवर अनेक बंधने घातली गेली. मात्र आजच्या प्रगत आणि जागरूक समाजात एक प्रश्न ठामपणे विचारला जात आहे. स्त्रियांना बंधनात ठेवण्यात कसला आलाय पुरुषार्थ?

खरा पुरुषार्थ म्हणजे स्त्रीला दडपून ठेवणे नव्हे, तर तिच्या क्षमतेचा सन्मान करणे. तिच्या स्वप्नांना पंख देणे, तिच्या कर्तृत्वाला संधी देणे आणि तिच्या अस्तित्वाला मान्यता देणे हाच खरा पुरुषार्थ आहे. स्त्रीला कमी लेखणे किंवा तिला मर्यादित ठेवणे ही कोणत्याही समाजाची प्रगती रोखणारी गोष्ट आहे. आजच्या काळात स्त्रिया शिक्षण, उद्योग, विज्ञान, क्रीडा, कला, प्रशासन अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. त्या कुटुंब सांभाळतानाच समाजाच्या विकासातही मोठा वाटा उचलत आहेत. त्यामुळे स्त्रियांच्या क्षमतेवर प्रश्न उपस्थित करण्याचे कोणतेही कारण उरलेले नाही. उलटपक्षी, त्यांच्या कर्तृत्वामुळे समाज अधिक सक्षम होत आहे.

परंतु काही ठिकाणी अजूनही जुनाट विचारसरणीचे सावट दिसून येते. स्त्रीने काय करावे, कसे वागावे, किती बोलावे यावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. तिच्या शिक्षणावर, करिअरवर किंवा स्वप्नांवर बंधने घातली जातात. अशा वृत्तीमुळे स्त्रीचे व्यक्तिमत्त्व मर्यादित होते आणि समाजाची प्रगतीही खुंटते. स्त्री ही केवळ घर सांभाळणारी व्यक्ती नाही; ती कुटुंबाची आधारस्तंभ आहे. तिच्या कष्टांमुळे आणि त्यागामुळे अनेक कुटुंबे उभी राहतात. आई, बहीण, पत्नी, मुलगी या विविध नात्यांतून ती प्रेम, जिव्हाळा आणि जबाबदारी यांचे सुंदर उदाहरण घालून देते. त्यामुळे स्त्रीचा सन्मान करणे ही केवळ सामाजिक जबाबदारी नाही, तर ती प्रत्येक व्यक्तीचे नैतिक कर्तव्य आहे.

समाज खऱ्या अर्थाने प्रगत होण्यासाठी स्त्री आणि पुरुष यांच्यात समानता असणे आवश्यक आहे. स्त्रीला शिक्षण, स्वावलंबन आणि निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले तर ती समाजासाठी मोठे योगदान देऊ शकते. स्त्रीला पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन देणे, तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे आणि तिच्या स्वप्नांना साथ देणे हेच समाजाच्या विकासाचे खरे सूत्र आहे.

आजच्या काळात अनेक पुरुषही या बदलाचा स्वीकार करत आहेत. ते महिलांच्या प्रगतीला पाठिंबा देत आहेत आणि समानतेचा विचार समाजात रुजवत आहेत. ही सकारात्मक बदलाची सुरुवात आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने या विचाराला बळ दिले तर स्त्रियांसाठी अधिक सुरक्षित, सन्माननीय आणि प्रगत वातावरण निर्माण होईल.

महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे. आपण स्त्रियांना खरोखरच समान संधी देत आहोत का? त्यांच्या स्वप्नांना प्रोत्साहन देत आहोत का?

कारण खरा पुरुषार्थ स्त्रियांना रोखण्यात नाही, तर त्यांना सन्मानाने जगू देण्यात आणि त्यांच्या कर्तृत्वाला बळ देण्यात आहे.

स्त्रीला बंधनात ठेवण्यात कोणताही अभिमान नाही; अभिमान आहे तो तिच्या स्वातंत्र्याचा आणि तिच्या यशाचा साक्षीदार होण्यात.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.